
AROTE Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon) Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
रुट कॅनॉल ट्रीटमेंट
हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. १४ जून २०२५



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : २३१ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com

Editor : Dr. Vishwasrao Anandrao Arote | Registration no. MAHMAR/2021/82132 | Pages : 4 | Year : 3rd | Issue : 231 | Amount : 4 Rs/- | Gmail : punegavkari@gmail.com


# ‘मॅक्स एरोस्पेस’ आणि उद्योग विभागात सामंजस्य करार

- नागपूरमध्ये उभारणार हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना
- सुमारे ८000 कोटींची गुंतवणूक होणार, 2000 रोजगार निर्मिती

मुंबई : (समर्थ गांवकरी)

नागपुरात सुमारे ८ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती कारखाना उभारण्यात येणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मॅक्स एरोस्पेस अँड एव्हिएशन प्रा. लि. आणि महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागात नागपूरमध्ये हेलिकॉप्टर उत्पादन कारखाना उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरमधील संरक्षण उत्पादन क्षेत्राला यामुळे गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



सह्याद्री अतिथीगृहात आयोजित कार्यक्रमात उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आदी उपस्थित होते. श्री. अन्बलगन आणि मॅक्स एरोस्पेसचे अध्यक्ष भरत मलकानी यांच्यात हा सामंजस्य करार झाला. या करारानुसार मॅक्स एरोस्पेस नागपूर येथे हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना उभारणार असून त्याचे प्रत्यक्ष काम 2026 पासून सुरू होणार आहे. या प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे दोन हजार रोजगार निर्मिती होणार असून या प्रकल्पात आठ वर्षांमध्ये सुमारे ८ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे.

हा करार भारताच्या ‘मेक इन इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ मोहिमेला चालना देणारा टप्पा ठरणार आहे. हेलिकॉप्टरचे कस्टमायझेशन आणि पूर्ण उत्पादन यासाठी समर्पित असलेला महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प असेल. या उपक्रमामुळे महाराष्ट्र हे एरोस्पेस उत्पादनाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येणार आहे.

या प्रकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रज्ञानाचा समावेश असून, रोटरी-विंग प्लॅटफॉर्म्सचे कस्टमायझेशन, इंटिग्रेशन आणि फ्लाइट टेस्टिंग यासाठी हे उत्कृष्टता केंद्र (सेन्टर ऑफ एक्सलन्स) म्हणून कार्य करणार आहे. नागपूर विमानतळाजवळ हे केंद्र असल्यामुळे विद्यमान पायाभूत सुविधा आणि लॉजिस्टिक सपोर्टचा लाभ घेता येणार आहे. यामुळे भारताच्या वाढत्या एरोस्पेस पुरवठा साखळीतही योगदान मिळणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मॅक्स एरोस्पेसने हेलिकॉप्टर उत्पादनासाठी महाराष्ट्र विशेषतः नागपूरची निवड केल्याचा आनंद आहे. मॅक्स एरोस्पेसच्या व्यवसायाच्या प्रवासात राज्य शासनही सहभागी आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी नागपूरमध्ये चांगल्या सुविधा निर्माण केल्या आहेत. मॅक्स एरोस्पेसला त्यांच्या उत्पादन कारखान्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. कंपनीने आपले उत्पादनाचे काम ठरलेल्या वेळेत सुरू करावे.

श्री. मलकानी यांनी नागपूरमध्ये संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी परिपूर्ण परिसंस्था असून उत्पादन निर्मितीसाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा राज्य शासनाने उपलब्ध करून दिल्या असल्याचे सांगितले. मी मूळचा महाराष्ट्राचा असल्याने महाराष्ट्रातच उत्पादन केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती क्षेत्रात महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

ही भागीदारी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार असून, भारताला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण करण्यास हातभार लावणारी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# इराणसोबत युद्ध सुरु असताना इस्रायलने भारताची माफी का मागितली?

मुंबई : (समर्थ गांवकरी)

सध्या इस्रायलची इराणसोबत लढाई सुरु आहे. मागच्या दोन दिवसात दोन्ही देशांनी परस्परांवर प्रचंड मोठे हल्ले केले आहेत. इस्रायलने या ऑपरेशनला रायजिंग लायन नाव दिलं आहे, तर इराणने आपल्या प्रतिहल्ल्याच्या कारवाईला ‘ट्रू प्रॉमिस 3’ नाव दिलं आहे. हे सगळं इतक्यात थांबणार नसल्याची चिन्ह आहेत. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी तसे स्पष्ट संकेत दिले आहेत. इस्त्रायल-इराणमध्ये ही लढाई सुरु असताना इस्रायलने भारताची माफी मागितली आहे. इराणसोबत युद्ध लढत असताना भारताची माफी मागण्याच कारण काय? असा प्रश्न तुम्हाला पडू शकतो. इस्रायलने भारताचा चुकीचा नकाशा दाखवला त्या बद्दल माफी मागितली आहे. इस्रायलने X वर पोस्ट करुन आपली चूक कबूल केली. “हा नकाशा अचूक भारतीय सीमा दाखवू शकला नाही. आमच्यामुळे जो काही त्रास झाला, त्याबद्दल क्षमा असावी” असं IDF ने पोस्टमध्ये म्हटलय.

इस्रायलने नकाशाचा फोटो शेअर करताना कॅप्शन दिली होती. “इराण एक जागतिक धोका आहे. आम्ही त्यांचं शेवटच टार्गेट नाही, ही तर सुरुवात आहे. आमच्यासमोर कारवाई करण्याशिवाय पर्याय नाही” असं लिहिलेलं. या नकाशामध्ये इराणला मध्यभागी दाखवण्यात आलं होतं.

# सोमवारपासून राज्यात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात

## ‘शाळा प्रवेशोत्सवा’च्या माध्यमातून होणार विद्यार्थ्यांचे स्वागत

मुंबई : (समर्थ गांवकरी)

पुढील शैक्षणिक वर्षाची सुरुवात विदर्भ वगळता इतर सर्व विभागांत सोमवार दि. 16 जून रोजी तर विदर्भात सोमवार दि. 23 जून 2025 पासून होणार आहे. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी ‘शाळा प्रवेशोत्सवा’च्या माध्यमातून मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी व मुलांची उपस्थिती वाढविण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर ‘शाळा प्रवेशोत्सव’ उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांना नजिकच्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये भेट देण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत शालेय गणवेश व इतर सोयी सुविधांचा आढावा घेण्यात येईल. तसेच शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यांच्याशी चर्चा करुन विद्यार्थ्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत प्रवेश घेण्याकडे कल कसा वाढेल, यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यात येतील. राज्यातील लोकप्रतिनिधींबरोबरच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी शाळांना भेट द्यावी याबाबत मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी नुकताच आढावा घेतला. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करावे. त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सूचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये संख्याज्ञान व कौशल्य



विकसित करण्यासाठी राज्यात निपूण महाराष्ट्र अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत दुसरी ते पाचवीच्या वर्गातील किमान 75 टक्के विद्यार्थ्यांना इयत्तेनुसार अध्ययन क्षमता प्राप्त करणे हे ध्येय आहे.

या कार्यक्रमांतर्गत पालकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळण्याकरिता शासनाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांनी ‘शाळा प्रवेशोत्सव’ कार्यक्रमामध्ये पालकांशी हितगुज साधावे.

# अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळल्यास कायदेशीर कारवाई

## शाकाहारी व मांसाहारी पदार्थाची तयारी, प्रक्रिया, शिजवणे वेगळे असावी

मुंबई : (समर्थ गांवकरी)

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत, अन्न सुरक्षा व मानके (परवाना व नोंदणी) नियमन, २०११ मधील अनुसूची ४ मधील सूचनांनुसार शाकाहारी व मांसाहारी पदार्थाची तयारी, प्रक्रिया, शिजवणे वेगळी असावी. शाकाहारी अन्नपदार्थाची मांसाहारी अन्नपदार्थापासून प्रक्रियात्मक व साठवणीच्या टप्प्यावर स्पष्टपणे वेगळी व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अन्न सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या अन्न व्यावसायिकांवर परवाना रद्द, दंड आकारणे किंवा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अन्न व औषध प्रशासनाचे



अन्न सुरक्षा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी कळविले आहे. सर्व अन्न व्यवसायिकांनी अन्न सुरक्षेबाबत असलेल्या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. अन्न व औषध प्रशासनामार्फत गतवर्षी राज्यातील ३० हजार अन्न व्यवसायिकांना अन्न सुरक्षेबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे तर या वर्षी एक लाख अन्न व्यवसायिकांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा ही केवळ कायदेशीर बाब नसून ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. नियमांच्या पालनात दोषी अन्न आस्थापनाना त्वरित नोटीस, कारवाई व आवश्यक ती कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे त्यांनी कळविले आहे. अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र आणि भारतीय अन्न व सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (FSSAI) यांच्या संयुक्त विद्यमाने अन्नसुरक्षा व प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यभर विविध प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा व जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे. अन्न व औषध प्रशासनात एकूण नवीन १८९ अन्न सुरक्षा अधिकारी ७ जून २०२५ रोजी रुजू झालेले असल्याने अन्न आस्थापना तपासणी संख्या निश्चितच वाढणार आहे.

राज्यभरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स व उपाहारगृहांमध्ये नियमित तपासण्या केल्या जात असून तपासणीत दोषी आढळणाऱ्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल. अन्न भेसळीसंदर्भात नागरिकांनीही हेल्पलाइन किंवा Food Safety Connect App च्या माध्यमातून तक्रार नोंदवावी. अधिक माहितीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी आपले नजीकचे अन्न व औषध प्रशासन कार्यालय किंवा https://fda.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असेही आयुक्त श्री. नार्वेकर यांनी कळविले आहे.

# शेजाऱ्यांच्या कुरापती! युद्धाआधीच चीनने इराणला दिले ‘हे’ शस्त्र

मुंबई : (समर्थ गांवकरी)

चिनची लबाडी जगभराला माहिती असतील तरी सध्या चीनने इराणला दिलेल्या एका शस्त्राची चर्चा रंगली आहे. इस्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू असताना चीनने इराणला नेमकं कोणतं शस्त्र दिलं आहे? चीनने इराणला अशा काही गोष्टींचा पुरवठा केला आहे, ज्यामुळे मध्यपूर्वेतील युद्धाचा चेहरामोहरा बदलू शकतो, असं म्हटलं जात असलं तरी हे कितपत सत्य आहे? याविषयी पुढे वाचा. इस्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू झाले आहे. ज्यू राष्ट्राने शुक्रवारी तेहरान आणि आजूबाजूच्या प्रमुख शहरांवर क्षेपणास्त्रे डागली आहेत. इस्रायलने या हल्ल्याला ऑपरेशन रायझिंग लायन असे नाव दिले आहे. या अंतर्गत इस्रायलने इराणमधील लष्करी तळ, क्षेपणास्त्र कारखाने आणि अणुशास्त्रज्ञांच्या घरांसह 200 हून अधिक लक्ष्यांवर अचूक हल्ले केले. त्यानंतर इराणने रात्री उशिरा तेल अवीववर 100 बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. आयर्न डोम आणि डेव्हिड स्लिंग सारख्या इस्रायली संरक्षणदलांनाही हा हल्ला रोखण्यात अपयश आले. या युद्धात अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स इस्रायलच्या पाठीशी उभे राहिले आहेत. इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा केली आहे. तर दुसरीकडे सर्वांच्या नजरा चीनकडेही लागल्या आहेत.

# श्री संत निळोबाराय पायी दिंडी सोहळा पालखी मार्गाची पाहणी

- निळोबारायांचा सोहळा भव्यदिव्य होईल-मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी.

पारनेर : (समर्थ गांवकरी)

श्री संत निळोबारायांचा पायीदिंडी पालखी सोहळा भव्यदिव्य होईल असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले. राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आणि "ब" वर्ग तिर्थक्षेत्र असलेल्या पारनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र पिंपळनेर येथील श्री संत निळोबारायांचा पायी दिंडी सोहळा पालखी सोहळा श्रीक्षेत्र पिंपळनेर ते श्रीक्षेत्र पंढरपूर या पालखी मार्गाची पाहणी करण्यासाठी आलेल्या अहमदनगर जिल्हापरिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी गुंजाळ यांनी संत निळोबाराय संस्थांनला भेट दिली.यावेळी देवस्थाचे वतीने दोघांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी झालेल्या बैठकीमध्ये आनंद भंडारी बोलत होते.

याप्रसंगी बोलताना आनंद भंडारी म्हणाले, राज्यशासनाने हा सोहळा अतिशय गांभीर्याने घेतला असून, सोहळा उत्साहात आणि भव्यदिव्य करण्याचा ठरविला आहे.

यासाठी लागणारी सर्व तयारी आता अंतिम टप्प्यात आली असून,राज्य शासनाचे वतीने जिल्हा प्रशासन सोहळ्यासाठी सज्ज झाले आहे. श्री संत निळोबाराय हे राज्यातील प्रमुख संतांपैकी एक आहेत. संत निळोबाराय यांची मनाची पालखी पंढरपूरला जात असताना लागणाऱ्या सुविधा पुरविल्या जातील.

त्यामुळे शासनाचे वतीने असलेली सर्व जबाबदारी आम्ही पूर्ण करणार आहोत.आज आम्ही पालखी मार्गाची पाहणी करत असताना कुठेही काहीही कमी पडू देणार नाही. या मानाच्या पालखी सोहळ्यासाठी श्रीगोंद्यापर्यंत जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत पाहणी करून त्या त्या भागामध्ये रस्त्यांचे रोलिंगसाठीचा आदेश दिला.पालखी मार्गांवर प्रत्येक जिल्हा प्रशासनाने सर्व वारकऱ्यांना विविध सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. यावेळी मानाच्या पालखीचा मुक्काम जिथे जिथे असेल तेथील ग्रामपंचायतला स्वच्छता, सफाई व सुविधांसाठी 2 लाख 50 हजार रुपयांचा निधी दिला आहे. सोहळ्यासाठी लागणाऱ्या वाटरप्रूफ मंडपासाठी 5 लक्ष्य रुपये, फिरते शौचालय, महिलांसाठी स्वतंत्र शौचालय, 5 पाण्याचे टँकर, 2 ऍम्ब्युलन्स, डॉक्टर्स, आरोग्य सुविधा व औषधांसाठी 7 लक्ष्य रुपये, अग्निशमनदल, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलेक्ट्रिसिटी बोर्ड, पोलीस प्रशासन सर्व सज्ज झाले आहेत.

यावेळी प्राजन्यराजाने कृपा केली, यापुढेही करावी अशी प्रार्थना आपण श्री संत निळोबाराय चरणी करूयात असेही मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले.

याप्रसंगी बोलताना संस्थानचे अध्यक्ष अशोकराव सावंत म्हणाले, यावर्षी भंडारी साहेब नवीनच रुजू झाले आणि सर्व सूत्र हाती घेऊन त्यांनी या पालखी सोहळ्याला भरपूर मदत शासनाचे वतीने दिली आहे. त्याबद्दल जिल्हाप्रशासनाला धन्यवाद दिले.

तसेच भंडारी साहेबांचा पायगुण चांगला असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले.

यावेळी संत निळोबारायांचे वंशज संस्थान व सोहळा प्रमुख गोपाळकाका मकाशीर,माजी सरपंच भाऊसाहेब, लटांबळे,संस्थांनचे सचिव लक्ष्मणखामकर, विणेकरी पांडुरंग रासकर,संत

निळोबाराय सेवामंडळ अध्यक्ष बबन गाजरे सचिव चांगदेव शिर्के,बाळकृष्ण सावंत, बाळासाहेब हरेल, मोतीराम कळसकर व देवस्थान चे सर्व विश्वस्त,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे जिल्हाध्यक्ष व देवस्थान चे प्रसिद्धी प्रमुख दत्ता गाडगे, सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते.

## सिंहासन




## थोडक्यात...



### बच्चू कडू आज अन्नत्याग आंदोलन थांबवणार?

मुंबई (समर्थ गांवकरी) : प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाने राज्याचे लक्ष वेधले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह शेतमजूर, दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी आदींसाठी बच्चू कडू यांनी 8 जूनपासून आंदोलनाचे हत्यार उपासले आहे. मोझरी येथील गुरुकुंज आश्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधीसमोर त्यांचे हे उग्र उपोषण सुरु आहे. काल सरकारच्या वतीने महसूलमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांची भेट घेतली. मंत्री बावनकुळे यांनी सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगितले. तर दुसरीकडे बच्चू कडू यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चेनंतर कार्यकर्त्यांची बाजू ऐकून उपोषण सोडण्याविषयी निर्णय घेणार असल्याचे सांगितले. आता थोड्याचवेळात ते निर्णय जाहीर करण्याची शक्यता आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आजचा सातवा दिवस आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलन स्थळी 200 पेक्षा अधिक पोलिसांचा चोख बंदोबस्त आहे.अन्नत्याग आंदोलन स्थळाला पोलीस छावणीचे स्वरुप आले आहे. त्यांचे कार्यकर्ते पण अनेक ठिकाणी आंदोलन करत आहेत. काल एका कार्यकर्त्याने विषारी औषध प्राशन केले होते. तर काहींनी कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना कोंडण्याचा प्रयत्न केला होता. कोणताही अनुचित प्रकार आंदोलन स्थळी होऊ नये यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क आहे. बच्चू कडू आज काय भूमिका घेणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### ‘पालकमंत्री असतानाही माझ्या जिल्ह्यातील कामे खोळंवली

मुंबई (समर्थ गांवकरी) : विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आले. भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांचे सरकार अस्तित्वात आले. या सरकारमधील मतभेद गेल्या काही दिवसांपासून समोर येत आहे. आता शिवसेनेचे बडे नेते आणि धारशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मनातील खदखद जाहीरपणे व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. धाराशिव जिल्हा नियोजन समितीच्या निधीवरून महायुतीत मतभेद यानिमित्ताने समोर आले आहे.



ठाणे : दिव्यातील साबेगाव भागातील नैसर्गिक नाला भूमाफियांनी बुजवल्याचा फटका स्थानिक शेतकरी सचिन नाईक यांना पडला असून पहिल्याच पावसाने पाणी चाळीमध्ये घुसल्याने प्रशासनास सदर शेतकऱ्याच्या शेतात मोठा चर खोदल्याने मनसे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील सदर पिडीत शेतकऱ्याची बाजू मांडण्यासाठी धावून गेले.

**(फोटो - संतोष पडवळ)**

# बच्चुभाऊ कडूंच्या उपोषणाला छावा क्रांतिवीर सेनेचा पाठिंबा !

## करण गायकर यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह कृषी मंत्र्यांना इशारा – "शेतकऱ्यांचे प्रश्न दुर्लक्षित झाल्यास ३६ जिल्ह्यांत रास्ता रोको करु!"

**अमरावती : (समर्थ गांवकरी)**

शेतकरी कर्जमाफीसह अन्य १७ मागण्यांसाठी मागील सहा दिवसांपासून उपोषण करत असलेले प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते व माजी मंत्री मा.बच्चुभाऊ कडू यांच्या आंदोलनाला आता छावा क्रांतिवीर सेनेने ठाम पाठिंबा जाहीर करत,या संघर्षात सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी अमरावतीतील उपोषण स्थळी प्रत्यक्ष भेट देत बच्चुभाऊ कडू यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी फक्त पाठिंबाच नव्हे,तर सेनेच्या वतीने उपोषणात सक्रिय सहभागी होण्याची घोषणा करत राज्य सरकारला तीव्र इशारा दिला.आम्ही केवळ सहवेदना व्यक्त करण्यासाठी आलो नाही,तर तुमच्या आंदोलनात सक्रिय सहभागी होणार आहोत.जर मागण्या मान्य झाल्या नाहीत,तर राज्यभर प्रत्येक जिल्ह्यांत छावा क्रांतिवीर सेनेच्यावतीने रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल", असे त्यांनी ठणकावले. करण गायकर यांनी यावेळी राज्य सरकारवर कठोर शब्दांत निशाणा साधत म्हटले की,जर सरकारने या उपोषणाची तात्काळ दखल घेतली नाही,तर आम्ही एकाही मंत्र्याला रस्त्यावर फिरू देणार नाही.हजारो कोटींचा भ्रष्टाचार करणारे अजित पवार माफ होऊ शकतात,तर शेतकऱ्यांचे काही लाखांचे कर्ज माफ का होऊ शकत नाही?यावेळी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या माणिकराव कोकाटेंवरही त्यांनी रोष व्यक्त करत,"डोके ठिकाणावर ठेवा नाहीतर तुमचे डोके सडकून ठेप्यावर आणू",असा कडक इशारा दिला. शेतकरी पुत्र म्हणून तुमच्याकडे राज्यातील शेतकरी आशेने बघतो आहे,परंतु तुम्ही अजित पवारांच्या नादाला लागून वेताळ वक्तव्य करणे थांबवा, अन्यथा शेतकऱ्यांना तुमचा बंदोबस्त करावा लागेल. आंदोलन ही सामाजिक बांधिलकी आहे,आणि छावा क्रांतिवीर सेनेचा प्रत्येक कार्यकर्ता शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभा राहील.हा लढा केवळ बच्चुभाऊंचा नसून संपूर्ण शेतकरी समाजाचा आहे. असेही त्यांनी ठामपणे सांगितले. गायकर यांनी स्पष्ट केले की,मा. बच्चुभाऊ कडू सरकारकडे कोणतीही अवास्तव मागणी करत नाहीत.नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत महायुतीने जनतेला जाहीरनाम्यात जे आश्वासने दिली कर्जमाफी,मोफत वीज, मनरेगामध्ये सुधारणा ती अंमलात आणा,एवढीच मागणी आहे. करण गायकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना "चाणक्य नेतृत्व",तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना "शेतकरी स्वाभिमानी नेते" संबोधले.त्यांनी आशा व्यक्त केली की ते नक्कीच शेतकऱ्यांना न्याय देतील.मात्र अजित पवार यांच्यासारखे बेताल वक्तव्य करून शेतकऱ्यांच्या मुळावर येणार नाहीत,अशी अपेक्षा आहे. छावा क्रांतिवीर सेनेच्या या ठाम आणि सक्रिय पाठिंब्यामुळे बच्चुभाऊ कडू यांचे आंदोलन अधिकच बळकट झाले आहे. आता राज्य सरकार यावर कोणती भूमिका घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.अन्यथा राज्यभर मोठा संघर्ष सर्व शेतकरी मिळवून उभा करतील.यावेळी हा पाठिंबा देण्यासाठी छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर,शिवाजी मोरे,सुभाष गायकर,नवनाथ शिंदे,डॉ.किरण डोखे,वैभव दळवी,संगीताताई सूर्यवंशी, सविताताई वाघ,गोरख संत,भारत पिंगळे,राम पाटील गाडेकर,अविनाश तांदळे,सोपान लांडगे,तुकाराम पाटील भुतेकर,रमेश पाटील तुपे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.



# संपादकीय






## मालदीव, पंतप्रधान मोदी आणि कतरिना कैफ

गेल्यावर्षी भारत आणि मालदीव यांच्या संबंधांत मोठीच कटुता निर्माण झाली होती. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील लक्षद्वीप बेटांना भेट दिल्यानंतर आणि या नितांत रमणीय अशा पर्यटनस्थळाला भारतीयांनी आवर्जून भेट द्यावी, असं आवाहन केल्यानंतर हा वाद अधिकच चिघळला. त्यात मालदीवच्या मंत्र्यांनीही यात उडी घेत थेट मोदींबद्दल वादग्रस्त विधानं केल्यानंतर भारतात सर्व स्तरात चीड व्यक्त केली गेली. मालदीवचे मंत्री मरियम शिऊना, अब्दुल्ला माजिद आणि माल्शा शरीफ यांनी यासंदर्भात अनावश्यक टिप्पण्या करत स्वच्छता आणि सेवेच्या बाबतीत भारत आमच्याशी कधीच स्पर्धा करू शकत नाही, अशी विधानंही केली होती. त्यानंतर भारतीय जनतेनं मालदीवच्या विरोधात स्वयंस्फूर्तीनं हॅशटॅग :oycottMaldives ही मोहीम चालवली होती. अनेकांनी पर्यटनासाठी मालदीवला जाण्यावर बहिष्कार टाकला. मालदीवची तिकिटं रद्द केली आणि लक्षद्वीपला जाणं पसंत केलं. त्याचा मालदीवला फारच मोठा फटका बसला. त्यांच्या आर्थिक नाड्या आवळल्या गेल्यावर भारतावर टीका करणाऱ्या तिन्ही मंत्र्यांना डच्चू मिळाला, शिवाय मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइजू यांनाही मध्यस्थी करावी लागली होती.

या पार्श्वभूमीवर बॉलिवूड अभिनेत्री कतिरना कैफ मालदीवची 'ग्लोबल टुरिझम ॲम्बॅसडर' झाल्याच्या बातमीनं अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. भारतीय पर्यटकांना मालदीवकडे पुन्हा आकर्षित करण्याचं काम कतरिना करणार आहे. यासंदर्भात कतरिनानं म्हटलं आहे, मालदीव हे आरामदायी राहणीमान आणि नैसर्गिक सौंदर्याचं प्रतीक आहे. ही एक अशी जागा आहे, जिथे साधेपणा आणि शांतता या दोन्ही गोष्टींचा संगम झालेला आहे. या 'सनी साईड ऑफ लाईफ' चा मी चेहरा असल्याचा मला अभिमान आहे. मालदीवच्या ज्या नागरिकांनी आणि मालदीवच्या मंत्र्यांनी भारताची खिल्ली उडवली होती, त्याच मालदीवची कतरिना कैफ ब्रॅण्ड ॲम्बॅसडर कशी काय झाली याबाबत अनेक नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे. मात्र, मालदीव आता 'डॅमेज कंट्रोल' च्या मूडमध्ये आहे. पंतप्रधान मोदी यांनाही त्यांनी मालदीव भेटीचं आमंत्रण दिलं आहे. मोदी पुढील महिन्यात मालदीवला जाणार आहेत.

ज्या मालदीवला भारतीयांनी आजवर मोठ्या प्रमाणावर सर्वतोपरी मदत केली, तोच मालदीव उलटल्यावर, 'इंडिया आऊट' सारख्या वादग्रस्त घोषणा त्यांनी दिल्यानंतर बॉलिवूडनंही मालदीवचा मोठ्या प्रमाणावर निषेध केला होता. यात अक्षय कुमार, जॉन अब्राहम, श्रद्धा कपूर यांनी पुढाकार घेतला होता. अक्षय कुमारनं तर आपल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, ज्या देशातले सर्वाधिक पर्यटक मालदीवमध्ये येतात, ज्यांच्या भरवशावर इथली अर्थव्यवस्था चालते त्याच देशाची बदनामी करणं, नावं ठेवणं ही गोष्ट अतिशय आश्चर्यकारक आहे! २०२३मध्ये जगातून भारतातले सर्वाधिक २,१०,१९८ नागरिक मालदीवला पर्यटनासाठी गेले होते. मात्र, दोन्ही देशांत वाद झाल्यानंतर जानेवारी ते एप्रिल २०२४ या काळात केवळ ४३,९९१ भारतीय पर्यटक मालदीवमध्ये आले. २०२३ला याच काळात भारतीय पर्यटकांची इथली संख्या मात्र ७३,७८५ होती! भारतीय पर्यटक तब्बल ४० टक्क्यांनी घटले!

# अवैध धंद्याचे पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या समोर आव्हान

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड तालुक्यात राजरोसपणे पणे अवैद्य धंदे जोरात सुरू आहेत. मागिल आठवड्यात काही बातम्या प्रसिद्ध होताच मटक्याच्या टपऱ्या दोन दिवस बंद ठेवण्याचा दिखावा करण्यात आला. मात्र दोन दिवस बंद झालेल्या मटका टपऱ्या पुन्हा जोराने सुरू झाल्या आहेत. तसेच अवैद्य धंदे कलाकेंद्राचे काटेकोर नियम व गुन्हेगारीवर वचक ठेवण्याचे आवाहन सध्या नवीन पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या समोर एक आव्हानच आहे. जामखेड पोलीस स्टेशनला पुर्वी आसलेले पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची बदली झाली त्यामुळे त्यांच्या जागेवर नवीन पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार घेतला आहे. सध्या मात्र जामखेड मध्ये सुरू असलेल्या अवैध धंद्याचे पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या समोर मोठे आव्हान आहे कारण सध्या जामखेड तालुक्यात राजरोसपणे अवैद्य धंदे जोरात सुरू आहेत. मागिल आठवड्यात अवैध धंद्याविरोधात काही बातम्या प्रसिद्ध होताच




पोलीस प्रशासनाने थातुर मातुर कारवाई केली होती पण पुन्हा प्रशासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखविली आहे. जामखेड शहरातील बाजार, तपनेश्वर गल्ली, सह अनेक ठिकाणी मटक्याची दुकाने सुरू आहेत. शहरातील कलाकेंद्रावर देखील नियम धाब्यावर बसवत कलेऐवजी त्या ठिकाणी डीजे लावुन डान्स सुरू आहे. तसेच कलाकेंद्र हे नियम धाब्यावर बसवून रात्रभर चालवण्यात येतात. त्यांच्या नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी प्रयत्न केले पाहिजेत.

# पुरस्कारकर्त्यांना भविष्यात शिवशाहीने प्रवास मोफत करणार

## फडणवीस : श्रीगोंद्याचे कसबे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

सामान्य जनतेच्या हितासाठी अहोरात्र काम करुण योगदान देणाऱ्या व्यक्तींची आम्ही दखल घेतो.आणि त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा आलेख अधीक उंचावून त्यांना आणखी नवीन प्रेरणा मिळावी म्हणून आदर्श पुरस्कार देवून सन्मानित केलं जात अशा पुरस्कार कर्त्येनां भविष्यात शिवशाहीने बस प्रवास मोफत करणार असे उद् गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना सांगितले.

सोमवार दि.10 जुन रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये राज्यांतील समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देवून सन्मानित केले. यामध्ये श्रीगोंदा तालुक्यातील श्रीगोंदा फॅक्टरी येथील रहिवासी बापुसाहेब कसबे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, मंत्री भरत गोगावले,मंत्री संजय राठोड यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते आण्णाभाऊ साठे पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या महान व्यक्तीचा पुरस्कार देवून सन्मान केला जातो.यापुढे हाच सन्मान आणखी चांगल्या पध्दतीने त्याचे स्वरुप बदलणार आहोत. यावेळी कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, उपसभापती निलम गोरे, आमदार विक्रम पाचपुते, यांच्या सह राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुरस्कार मिळाल्या बद्दल बापुसाहेब कसबे म्हणाले गेली 31 वर्षे सर्व सामान्य माणसाला केंद्रबिंदू समजून माझ्या कुवतीप्रमाणे मांतग समाजासह सर्व जातिधर्मातिल गोरगरीब लोकांना न्याय देण्यासाठी अहोरात्र झटत आहे. याच माझ्या कामाची दखल सामाजिक न्याय विभागाने घेऊन मला राज्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवर मंत्राच्या उपस्थिती मध्ये मला आण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार देवून सन्मानित केले. हे माझे भाग्य आहे. हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून सर्व समाजाचा पुरस्कार आहे असे कसबे म्हणाले. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कसबे यांचे अभिनंदन केले आहे.

# वडाळा महादेव येथे वृक्ष भेट देऊन शिक्षकांचा सन्मान !

## २३ वर्षानंतर मित्र - मैत्रिणी एकत्र 'स्नेह मेळावा उत्साहात संपन्न

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय या ठिकाणी २००१ - २००२ इयत्ता दहावी बॅच या विद्यार्थ्यांनी अगदी इयत्ता पहिली पासून शालेय जीवन इयत्ता दहावीपर्यंत सोबत हसत खेळत रमत - गमत एकत्र जोपासले परन्तु दहावीनंतर मित्र - मैत्रिणी यांची भेट होणे दुर्मिळ झाली होती म्हणून येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच विमा प्रतिनिधी यांनी मोबाईल व्हाट्सॲप च्या माध्यमातून त्यांना एकत्र करत मित्रांचे वाढदिवस साजरा करण्याचा प्रयत्न सुरू केला मात्र वेळेअभावी अनेकांची उत्सुकता यामध्ये कमी प्रमाणात असल्याने येथील ज्येष्ठ शिक्षक विकास राठोड तसेच गणेश कुसळकर यांनी एकत्र येत डॉ.मतीन शेख, सौ. छाया गायकवाड यांच्याशी चर्चा विनिमय करून गेट-टुगेदर स्नेह मेळावा या निमित्ताने सर्व शालेय मित्र-मैत्रिणी यांना एकत्र करण्याचा निर्णय घेतला, यावरून सर्व शिक्षक वृंद तसेच सर्व मित्र-मैत्रिणी यांना याबाबत माहिती देऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यावेळी शाळेतील वर्ग पुन्हा भरविण्यात आला तसेच प्रसंगी जुन्या आठवणींना उजाळा देत शालेय वर्गाचे सुशोभीकरण करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मतीन शेख यांनी केले तर सूत्रसंचालन सौ. छाया गायकवाड, ज्येष्ठ शिक्षक विकास राठोड सर यांनी केले.

यावेळी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले, प्रसंगी गुरुजन वर्ग, मान्यवर यांचा वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात आला तसेच दिवंगत शिक्षक व्यवहारे मॅडम, लचके सर, बनकर सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे सर्वश्री मुख्याध्यापक .डी.एन. माळी, माजी मुख्याध्यापक मोहन सर, माजी ज्येष्ठ शिक्षक के. बी. वमने, मा. शेख सर, दवंगे सर, खरात सर, खर्डे सर, बेल्हेकर सर, काळे सर, श्रीमती शेख मॅडम, बाळासाहेब कसार, प्रशांत बांडे,संदीप जाधव, आदि शिक्षक यावेळी उपस्थित होते.

सर्वानुमते उपस्थित माजी विद्यार्थी यांना शुभेच्छा देऊन भविष्यात आरोग्य याविषयी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी हायकोर्ट न्यायालयीन कर्मचारी अमोल राऊत, उद्योजक महेश महाले, किशोर गायकवाड, पवन गायकवाड, इंजि.संदीप कदम, निलेश पवार, उद्योजक सुरेंद्र होळकर, पुंडलिक देंडगे, संतोष शिंगटे, बाळासाहेब अनारसे, डॉ. योगेश कसार, उद्योजक महेश मैड,महसूल अधिकारी सुजित कसार, डॉ. मतीन शेख, ग्रामविकास अधिकारी हितेश ढुमने, प्रगतशील शेतकरी महेश जोशी,अब्दुल सय्यद, गणेश गायकवाड, भीमराव बुलबुले, नितीन गायकवाड, रामनाथ सोनवणे अविनाश चौधरी, सतीश कुलकर्णी, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रफुल पवार, विनायक राऊत, नवनाथ गुंड, सौ. कविता कसार, छाया गायकवाड, प्रतिभा जेजुरकर, मीनाक्षी गायकवाड, चित्रा कसार, मनीषा कसार,सुवर्णा पोकळे, मनीषा गायकवाड, स्वप्नाली काळे आदी या कार्यक्रमासाठी प्रयत्नशील होते.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी तसेच उच्च पद भूषविलेले माजी शालेय विद्यार्थी यांचा मान्यवरांचा हस्ते सन्मान करण्यात आला.

सदरचा आगळावेगळा कार्यक्रम पाहून मित्र - मैत्रिणी यांचे मन भारावून गेले अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून यशस्वी जीवनाची माहिती यावेळी विशद केली. स्नेहभोजन यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान तसेच ग्रा.प. सदस्य प्रफुल्ल पवार, इंजि.संदीप कदम, विमा प्रतिनीधी गणेश कुसळकर, ज्येष्ठ शिक्षक विकास राठोड यांनी आभार मानत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नाशिक येथे डिसेंबरमध्ये होणार विश्व मराठी संमेलन

- **मराठी भाषा मंत्री उदय सामंत, जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्व तयारीची बैठक**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक येथे २६ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत विश्व मराठी संमेलन होणार आहे. या संमेलनाच्या पूर्व तयारीसाठी कार्यालय सुरू करून नियोजनाचा नियमितपणे आढावा घ्यावा, अशा सूचना उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी विश्व मराठी संमेलनाच्या नियोजनसंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार सीमा हिरे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकुमार देवरे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे, मराठी भाषा विभागाचे उपसचिव डॉ. नामदेव भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, मराठा विद्याप्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, समीक्षक डॉ. रमेश वरखेडे, उद्योजक धनंजय बेळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, साहित्यिक उपस्थित होते.

मंत्री श्री. सामंत म्हणाले की, अभिजात मराठी भाषेच्या वैश्विक प्रचार आणि प्रसारासाठी जगभरातील मराठी भाषकांनी एकत्र येऊन एकाच व्यासपीठावर सर्वांगीण चर्चा व्हावी म्हणून विश्व मराठी संमेलन होत आहे. या संमेलनासाठी मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे सहकार्य मिळणार आहे. या संमेलनानिमित्त विविध कार्यक्रम होतील. त्यांना उत्तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा स्पर्श लाभलेला असेल. या संमेलनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. यासाठी विविध समित्या गठित करण्यात येतील. या संमेलनाचे कार्यालय नाशिक येथे १६ ऑगस्ट २०२५ पासून कार्यान्वित होईल. या कार्यालयाच्या माध्यमातून संमेलनाच्या तयारीचा नियमितपणे आढावा घेण्यात येईल. या संमेलनात अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असेल, असे नियोजन करण्यात येईल.



## जाहिर निविदा

### ग्रामपंचायत कार्यालय खटकाळे/खैरे, ता. जुन्नर, जि.पुणे

**निविदा सुचना २०२४-२५**

ग्रामपंचायत खटकाळे / खैरे ता. जुन्नर जि. पुणे यांचेकडील जनसुविधा अंतर्गत खालील कामांची सीलबंद निविदा अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. खालील प्रत्येक कामाकरीता निविदा फी ५०० व बयाना रक्कम अंदाजपत्रकाच्या १ % आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | निविदा फी | बयाना रक्कम १% | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | खटकाळे अंतर्गत खैरे येथे स्मशानभूमी बांधणे | ८४५४४६/- | ५००/- | ८४५४/- | ३ महिने |

टीप – १) निविदा स्वीकारण्याची तारीख १४/०६/२०२५ ते २१/०६/२०२५ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील. २) निविदा दि. २४/०६/२०२५ रोजी उघडण्यात येतील. ३) सदर काम अंदाजपत्रका प्रमाणे व शाखा अभियंता यांचे सूचनेप्रमाणे करणेत येईल. ४) कामाच्या बिलातून सर्व शासकीय रक्कम वजावट करण्यात येईल. ५) निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खटकाळे / खैरे, ता.जुन्नर, जि.पुणे

सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत खैरे खटकाळे, ता.जुन्नर, जि.पुणे



## श्रीगोंदा प्रहार संघटनेचा बच्चूभाऊ कडू यांच्या उपोषणाला पाठिंबा

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, दिव्यांगांना मानधन यासारख्या मागण्यांसाठी अमरावतीतील मोझरी येथे आमदार बच्चूभाऊ कडू यांनी ८ जून २०२५ पासून सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला आता श्रीगोंदा तालुका प्रहार जनशक्ती पक्षाने अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. या आंदोलनाचा आज पाचवा दिवस असूनही शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, याबाबत नाराजी व्यक्त करत श्रीगोंदा तालुका प्रहार संघटनेने तहसीलदार श्रीगोंदा यांच्यामार्फत शासनाला निवेदन सादर केले. या निवेदनात बच्चूभाऊ कडू यांच्या लोकहितार्थ सुरु असलेल्या आंदोलनाचे समर्थन करत तातडीने त्यांच्या मागण्यांचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. "जर शासनाने वेळेवर योग्य निर्णय घेतला नाही, तर श्रीगोंदा तालुका प्रहार संघटनेच्यावतीने कोणतीही पूर्वसूचना न देता संविधानिक मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल. याला पूर्णपणे शासन जबाबदार राहील," असा स्पष्ट इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे. या वेळी प्रहार संघटनेचे माधव बनसूडे, गुरु गायकवाड, कृष्णा खामकर, अमोल कांबळे, ज्ञानेश्वर भैलुमे तसेच ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अमर घोडके, संजय रणसिंग आदी कार्यकर्ते उपस्थित होते. प्रहार जनशक्ती पक्षाची ही भूमिका शेतकरी व दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांसाठी बळ देणारी असून आगामी काळात या आंदोलनाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.

## रविवारी विद्यार्थी गुणगौरव सोहळा

नाशिक (स. गांवकरी) : शिवसेना प्रणीत सर्वज्ञ श्री सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभव करिअर मार्गदर्शन शिबिर रविवारी (दि. १५) दुपारी ४ वाजता क्षत्रिय मंगल कार्यालय श्री श्री रविशंकर मार्ग, विजय-ममता टॉकीजच्या पाठीमागे आयोजित करण्यात आले आहे. या मार्गदर्शन कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन शिवसेना नाशिक जिल्हा संघटक योगेश म्हस्के यांनी केले आहे.

## शिव, शाहू, फुले आंबेडकर विचार प्रबोधिनी प्रबोधन व गौरव सोहळा

श्रीरामपूर (स. गांवकरी) : शिव, शाहू,फुले आंबेडकर विचारधारा प्रबोधन समितीच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गुणगौरव आणी सन्मान करण्यासाठी गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निमंत्रक नितीन मच्छिंद्र शिंदे (सरपंच), दादासाहेब अंबादास कांबळे, सौ.मोहिनी अशोक खैरे, सौ.सोनाली संतोष देवराय यांनी दिली आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.अशोक (नाना) कानडे (कार्याध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिर्डी लोकसभा मतदारसंघ तथा मा. नगरसेवक) आणी मा.बालाजी सोनटक्के साहेब (मा.सहा.आयुक्त,तपास अधिकारी विभागीय पोलिस तक्रार प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर) व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा.भास्कर लहाने यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि.१४ जुन २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बेलापूर रोड येथील यशोधन या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी संपर्क कार्यालयात,सामाजिक कार्याबद्दल आदिवासी नेते मा. शिवाजी गांगुर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष संतोष देवराय, पत्रकार मा. शौकतभाई शेख, मा.कार्लस साठे (सर), मेजर कृष्णा सरदार आदिंचा गौरवपर सन्मान करण्यात येणार आहे, तरी या गौरव सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे शिव, शाहू, फुले आंबेडकर विचारधारा प्रबोधन समितीच्या वतीने आवाहनही करण्यात आले आहे.

## १३ लाखांची फसवणूक; नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर तालुक्यातील रूईछत्तीशी (ता. अहिल्यानगर) येथील शेतकर्‍याची विमाननगर, पुणे येथील व्यापार्‍याने १३ लाख ५७ हजार ८८५ रूपयांची फसवणुक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बुधवारी (११ जून) अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. रामकृष्ण नामदेव दरंदले (वय-४७) असे फसवणुक झालेल्या शेतकर्‍याचे नाव असून त्यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. सुरेश प्रसाद नामक व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ जानेवारी २०२४ रोजी रात्री ८ वाजता ते ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९.४७ च्या दरम्यान, रूईछत्तीशी येथील शिवारामध्ये मका विक्रीचा व्यवहार करण्यात आला होता. फिर्यादी दरंदले यांनी एकूण ३० लाख ५७ हजार ८८५ रूपयांची मका सुरेश प्रसाद याला विकला. सुरूवातीला सुरेश प्रसाद याने १७ लाख रूपये अदा करून विश्वास संपादन केला.मात्र, उर्वरित १३ लाख ५७ हजार ८८५ रूपयांची मागणी दरंदले यांनी वारंवार फोनवरून केली असताना, सुरेश प्रसाद याने टाळाटाळ करत उडवाउडवीची उत्तरे दिली आणि रक्कम दिली नाही. दरम्यान, सुरेश प्रसाद हा उर्वरित पैसे देत नसल्याचे दरंदले यांच्या लक्ष्यात आल्यानंतर त्यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीची चौकशी झाल्यानंतर यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक रमेश गांगर्डे करीत आहेत.

## महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : दि. ११ जून रोजी जिल्हा परिषद सभागृहात राज्य कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष श्री. दादाभाऊ गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी निवडणूक पार पडली. संघटनेची कार्यकारिणी खालीलप्रमाणे, अध्यक्ष-श्री. राहुल अशोक शेळके – उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), उपाध्यक्ष- श्री. भगवान उत्तमराव बच्छाव, सहाय्यक गटविकास अधिकारी (ग्रामपंचायत) महिला उपाध्यक्ष- श्रीम. राणी फराटे, गटविकास अधिकारी – श्रीगोंदा, सरचिटणीस- श्री संदीप दळवी सहा. गटविकास अधिकारी, कोपरगाव, कोषाध्यक्ष- श्री. दिलीप सोनकुसळे, सहा. गटविकास अधिकारी, अहिल्यानगर, कार्याध्यक्ष- श्री. राजेंद्र (बाबा) देसले- प्रकल्प संचालक (एसबीएम) मुख्य सल्लागार- श्री. संभाजी भगवंतराव लांगोरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सल्लागार- श्री. दादाभाऊ नामदेव गुंजाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रवक्ता- श्री. सुधाकर मुंडे – गट विकास अधिकारी, राहुरी, महिला प्रतिनिधी- सोनल शहा गटविकास अधिकारी, शेवगाव यांची निवड करण्यात आली. जिल्हा परिषद, प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंद भंडारी यांनी नुतन कार्यकारिणीचे अभिनंदन केले.

## शनिशिंगणापूर देवस्थानचा निर्णय

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थानाने एक मोठा निर्णय घेत १६७ कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. यामध्ये ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. अनियमितता आणि शिस्तभंगाच्या कारणास्तव ही कारवाई करण्यात आल्याचे मंदिर ट्रस्टने स्पष्ट केले. मात्र, या निर्णयामागे हिंदू संघटनांनी गेल्या काही दिवसांपासून केलेला दबाव आणि आंदोलन कारणीभूत असल्याचे दिसते.

# शेतकऱ्यांचा खंबीर आधारस्तंभ



## अशोकराव (आण्णा) देशमुख यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास!

**डॉ. विश्वास आरोटे-कळसुबाई शिखरावरून**









अकोले : (समर्थ गांवकरी)

अहील्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील २ जून १९५६ रोजी उंचखडक बुद्रुक या छोट्याशा गावात जन्मलेल्या अशोकराव उर्फ 'आण्णा' देशमुख हे आज संपूर्ण अकोले तालुक्यात एक प्रेरणास्थान मानले जातात. वडिलोपार्जित शेतीच्या खडतर परिस्थितीतून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज सहकार क्षेत्रातील एक नावलौकिक नेतृत्व म्हणून समोर आला आहे.

परिस्थितीवर मात करत शेतीत आधुनिक प्रयोग : आपल्या तरुण वयात त्यांनी परिस्थितीवर मात करत १.५ किलोमीटर लांबून पाइपलाइनद्वारे पाणी आणून आधुनिक शेतीचा आदर्श उभा केला. हा प्रयोग संपूर्ण तालुक्यासाठी दिशादर्शक ठरला.

शेतकरी आंदोलक ते ग्रामविकास कार्यकर्ता : १९८३ ते १९९० दरम्यान दूध दरवाढ, मीटर हटाव, पाणी प्रश्न अशा अनेक विषयांवर त्यांनी झुंज दिली. ३२व्या वर्षी सरपंच म्हणून निवडून येत त्यांनी गावासाठी स्वच्छ पाणी, रस्ते, शाळा यांसारख्या मूलभूत गरजांवर भर दिला.

सहकार चळवळीतील भक्कम नेतृत्व : १९९४ पासून ते विविध सहकारी संस्थांमध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक पदांवर कार्यरत राहिले. गावच्या पतसंस्था, साखर कारखाना, दुग्ध संस्था यांच्या माध्यमातून त्यांनी गावकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत मोलाची भूमिका बजावली.

राजकीय योगदान आणि सामाजिक भान : २००७ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. पुढे २०१६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील होऊन तालुक्याच्या विविध प्रश्नांवर आंदोलनात्मक नेतृत्व दिले. जनावरांच्या लसीकरणाच्या प्रश्नापासून ते पाण्याच्या प्रश्नांपर्यंत, आण्णा नेहमी अग्रस्थानी राहिले.

'सहकार भूषण' पुरस्काराने गौरव : फेब्रुवारी २०२५ मध्ये 'व्हॉइस ऑफ मीडिया' आणि आमदार डॉ. किरणजी लहामटे मित्रमंडळ यांच्यातर्फे 'सहकार भूषण' पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या दशकांतील निःस्वार्थ कार्याचा सन्मान होता.

स्वतःच्या नावाने कधीही प्रचार न करणारे, केवळ कामातून ओळख निर्माण करणारे अशोकराव देशमुख यांच्यासारखे नेते आज दुर्मिळ झाले आहेत. त्यांच्या सहकार, राजकारण आणि समाजकारणातील तिन्ही अंगांतून त्यांचे योगदान हे पुढच्या पिढीसाठी दीपस्तंभ ठरणारे आहे.

विशेष : २ जून २०२५ रोजी त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून, तालुक्यातील विविध संघटना, कार्यकर्ते, व ग्रामीण भागातील जनतेकडून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा भिवंडी तालुक्यात विकास योजनांचा आढावा व भेटी दौरा

जिल्हा परिषद, ठाणे: (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दि. १२ जून, २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन विकास योजनांची अंमलबजावणी, अडचणी व गरजा यांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. प्राथमिक आरोग्य कोन (ता. भिवंडी) येथील आरोग्य केंद्राच्या इमारतीची पाहणी करण्यात आली. सद्यस्थितीत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन पर्यायी जागेची पाहणीही करण्यात आली. नवीन आरोग्य केंद्र उभारण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तत्काळ सादर करण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य व ग्रामपंचायत विभागाला दिल्या. दरम्यानच्या कालावधी मध्ये पर्यायी इमारतीची पाहणी केली व अनुषंगिक सुचना केल्या. या भेटीदरम्यान गोवे व ओवळी या ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा दोन अंतर्गत "आवास प्लस सर्वेक्षण" शून्य नोंद असलेल्या गावांचा समावेश असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या गावांना भेट देऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. योजनेबाबत सविस्तर माहिती घेतली आणि लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात यावी, याबाबत स्पष्ट सूचना दिल्या.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय काव्य लेखन पुरस्कार

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



कवी सुभद्रासुत आंधळे (रा. केडगाव, अहिल्यानगर) लिखित मायबाप विद्यापीठ या वास्तववादी काव्यसंग्रहास डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय काव्य लेखन पुरस्कार जाहीर करण्यात आला असून पुणे येथे पार पडलेल्या विशेष समारंभात त्यांचा गौरव करण्यात आला.

सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या या काव्यसंग्रहाची निवड संत गाडगे महाराज विचार मंच, ओतूर आणि ज्ञानज्योत फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य, मांजरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वर्धापन दिन विशेष कार्यक्रमात राज्यभरातून मागवलेल्या विविध साहित्यकृतींमधून करण्यात आली. यामध्ये काव्यप्रकारातील सुभद्रासुत आंधळे यांची निवड करण्यात आली.

सन्मानप्रदान सोहळा पुण्यातील वेदशास्त्रोत्तेजक सभागृह, सदाशिव पेठ येथे गेल्या शनिवार (दि. ७ जून) रोजी संपन्न झाला. यावेळी कवी सुभद्रासुत आंधळे यांना त्यांच्या कन्या शितल आंधळे यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि साहित्यप्रती प्रदान करून गौरवण्यात आले.

या सोहळ्याचे संमेलनाध्यक्ष जग बदलणारा बापमाणूस या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक जगदीश ओहोळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक हनुमंत पडवळ उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे उद्घाटन इंदू फार्मा, पुणेचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे यांच्या हस्ते झाले.कवी सुभद्रासुत यांचा हा चौथा काव्यसंग्रह असून अष्टाक्षरी प्रकारातील आणि शॉपिझन डॉट ईन प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला आहे.

कार्यक्रमाचे नियोजन संत गाडगे महाराज विचारमंचचे संस्थापक कार्याध्यक्ष रणजीत पवार, अध्यक्ष खं. र. माळवे आदींनी केले.

## नाले साफसफाईसाठी शिवराष्ट्र सेना उपोषण करणार

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



येथील शहरातील मनपा हद्दीत असणारे ४१ ओढे नाले नष्ट झाल्यामुळे शहरांमध्ये भर पावसाळ्यामध्ये आपत्ती व्यवस्थापन याचे नियोजनाचा अभाव असल्याने व मनपाने नेमून दिलेल्या ठेकेदार व त्याची यंत्रणा अयशस्वी ठरल्याने गेली.

दहा ते पंधरा वर्षापासून संपूर्ण मॅनेजमेंट होऊन अंतर्गत नालेसफाई व तसेच सीना नदी व अंतर्गत येणारे ओढे- नाले यांची सफाई ठेकेदार एजन्सीला दिले जाते, परंतु यावर कोणताच वचक नसून सीएसआय व एसआय हे फक्त कागदोपत्री ठेकेदारांना काम केल्याचे सर्टिफिकेट देतात, परंतु रस्त्यावर काम होताना दिसत नाही. तसेच सीना नदीचा गाळ जेसीपीने तिथल्या तिथच सरकावला जातो. व पुर आल्यानंतर तो गाळ पुन्हा तेथेच येऊन पडतो.

तसेच शहरातील ३२ हॉस्पिटल यांची चौकशी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची सक्तीच्या रजेवर गेल्यानंतर झालेली चौकशी होती. पुढे या ३२ हॉस्पिटलच्या काय कारवाई केली याची मनपाने कुठलीही माहिती दिलेली नाही. हे अचानक हे हॉस्पिटल पावन कसे करून घेतले. हा नागरिकांना पडलेला प्रश्न आहे.

तसेच उपनगरातून व शहरातील मध्यवस्तीत येणारे दिल्ली गेट कापड बाजार, नवी पेठ व जुना बाजार या ठिकाणी वाहने लावण्यास व्यापारी दुकानदार मज्जाव करतात. यासाठी व तसेच प्रत्येक दुकानापुढे लागणाऱ्या चार चाकी व्यावसायिक गाड्या यामुळे नागरिकांना शहरात पायी चालण्यासाठी साधी वाटही मिळत नाही.

मोठमोठ्या सणांना महिला व जेष्ठ नागरिक तसेच लहान मुले यांना फार मोठ्या त्रासातून जावे लागते. तरी या आमरण उपोषणात वरील दोन मुद्द्यांपैकी या ठिकाणी रास्ता रुंदी करण्यात यावी, असे शिवराष्ट्र सेना पक्षाच्या वतीने करण्यात आले.

## भाजपा मंडल अध्यक्षांच्या निवडी जाहीर

नाशिक : (समर्थ गांवकरी)

भारतीय जनता पक्षाच्या मध्य विधानसभा क्षेत्रातील दोन मंडल अध्यक्षांच्या निवडी आज जाहीर करण्यात आल्या.

द्वारका मंडळ
अध्यक्ष – उदय जोशी
जुने नाशिक मंडळ
अध्यक्ष – सचिन मोरे

या नियुक्त्यांची घोषणा भारतीय जनता पार्टीचे नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनील केदार यांनी केली.

या प्रसंगी भाजप नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनील केदार, मा.शहराध्यक्ष प्रशांत जाधव, आ.प्रा.देवयानी फरांदे,आ. सीमा हिरे,आ.अॅड.राहुल ढिकले,प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी,ज्येष्ठ नेते विजय साने,मा. आ.बाळासाहेब सानप, गिरीश पालवे,प्रदीप पेशकार, मा.महापौर सतीश कुलकर्णी, अॅड.श्याम बडोदे,रोहिणी नायडू,हिमगौरी आडके,माजी मंडल अध्यक्ष सुनील देसाई व भास्कर घोडेकर यांनी दोन्ही नवनियुक्त मंडलाध्यक्षांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

भारतीय जनता पक्षामध्ये संघटनात्मक कार्य करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांना नेहमीच संधी दिली जाते.

# आषाढी वारीसाठी अहील्यानगर जिल्ह्यास 2.61 कोटींचा निधी

**पालकमंत्री विखे पाटील यांची माहिती!**




अहील्यानगर : (समर्थ गांवकरी)

आषाढी यात्रेकरीता अहील्यानगर जिल्ह्यातून मार्गस्थ होणाऱ्या पालख्या समवेत असलेल्या वारकऱ्यांच्या सुविधांसाठी जिल्ह्याकरीता राज्य सरकारने २ कोटी ६१ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहीती जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून सदर निधी उपलब्ध होणार असून, या निधीतून वारकऱ्यासाठी वॉटरप्रूफ मंडप, शौचालय, स्नानगृह, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, आणि ग्रामपंचायत सहाय्य अनुदान दिले जाणार आहे.

अहील्यानगर जिल्ह्यातून पैठण येथील संत एकनाथ महाराज, त्र्यंबकेश्वर येथील संत निवृतीनाथ महाराज, पिंपळनेर येथून संत निळोबाराय महाराज या महत्वपूर्ण देवस्थानाच्या पालख्या बरोबरच स्थानिक पातळीवरील सुमारे १६० पालख्या पंढरपूरकडे दरवर्षी जात असतात. यामध्ये महीला पुरूष वारकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. प्रवासा दरम्यान मार्गावर गैरसोय होवू नये म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मागील दोन वर्षापासून जिल्हा प्रशासनाच्या सहकाऱ्याने वारकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत पालखी नियोजन सोहळ्याची बैठक संपन्न झाली होती. या बैठकीत वरीष्ठ अधिकाऱ्यासह प्रमुख देवस्थानाचे प्रतिनिधी जिल्ह्यातील दिंड्याचे प्रमुख उपस्थित होते. यामध्ये पालखी मार्गावर येणाऱ्या अडचणी मंत्री विखे पाटील यांनी जाणून घेतल्या होत्या. मागील वर्षापासून जिल्हा प्रशासनाच्यावतीने पालख्या जाणाऱ्या मार्गांवरुन सर्वसुविधा पुरविण्यात येत असून, यासाठी विविध विभागांचे अधिकारी समन्वयक म्हणून काम करतात. अहिल्यानगर जिल्ह्याने सुरु केलेला हा पॅटर्न राज्यातही चर्चेत आला आहे. सोलापूर जिल्हृयातही पालख्यांकरीता याच पद्धतीचे नियोजन करण्यात येवू लागले आहे.

यामध्ये प्रामुख्याने पावसाचे दिवस असल्याने मुक्कामाच्या ठिकाणी वॉटरप्रुफ मंडपाची मागणी, रस्त्याचे प्रश्न, शौचालय, वैद्यकीय सुविधा आणि पिण्याच्या पाण्याबाबतच्या समस्या वारकऱ्यांनी बोलून दाखवल्या होत्या. यासर्व व्यवस्थांमध्ये प्रशासन कुठेही कमी पडणार नाही आशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली होती. यासाठी त्यांनी राज्य सरकारकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्याना दिले होते. सादर झालेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करून मंत्री विखे पाटील यांनी ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून सुमारे २ कोटी ६१ लाख ८० हजार रूपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून दिला आहे. शासनाने मंजूर केलेल्या निधीतून वारकऱ्यांना सर्व मार्गावर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले आहेत.




## स्टेट बँक ऑफ इंडिया श्रीगोंदा शाखेच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर संपन्न

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा श्रीगोंदा व अर्पण ब्लड बँक संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्टेट बँक ऑफ इंडिया च्या २१९ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बँकेचे शाखा प्रबंधक सुदर्शनसिंह रावत, कृषी अधिकारी मिलिंद पाटील ,मेजर बाबासाहेब चॉंदमारे यांच्यासह ३४ रक्तदात्यांनी रक्तादान केले . स्टेट बँकेने अर्पण ब्लड बँक संगमनेर या रक्तपेढीच्या माध्यमातून रक्तदान शिबिर घेतले यात आपण सहभागी होऊन सामाजिक कार्य केले त्यामुळे अनेक रुग्णांच्या सेवेस मदत झाली या केलेल्या महान कार्यास आपला सहभाग फार मोलाचा असून आपल्याकडून यापुढे असा समाजसेवा घडो अशी अशा यावेळी शाखा प्रबंधक सुदर्शनसिंह रावत यांनी व्यक्त केली यावेळी शाखा प्रबंधक सुदर्शनसिंह रावत यांचा अर्पण रक्तपेढीच्या वतीने गौरव पत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला गौरव पत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

## शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी अरुण उंडे यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये १३ जुन ते २६ जुन २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## अहिल्यानगर : जिल्हा परिषद प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यातील जिल्हा परिषद निवडणुका गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ रखडल्या होत्या. या निवडणुकांसाठी अखेर प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ग्रामविकास विभागाने यासंदर्भात पावले उचलली आहेत. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी प्रभाग रचनेचे आदेश जारी केले आहेत. यामुळे नगरसह राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये निवडणूक प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.ग्राम विकास विभागाने दिलेल्या निर्देशानुसार १४ जुलै २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करणार आहेत. त्यावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी २१ जुलै पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. आलेल्या हरकती आणि त्यावरील अभिप्राय विभागीय आयुक्तांना सादर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना २८ जुलै पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन निर्णय देण्याचा अधिकार विभागीय आयुक्तांना असून त्यासाठी विभागीय आयुक्तांना १९ ऑगस्ट २०२५ पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. त्यानंतर अंतिम प्रभाग रचना मान्यतेसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना १८ ऑगस्ट पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे.

## कोठला परीसरातील हॉटेलला मध्यरात्रीसमयी भीषण आग

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील कोठला, राज चेंबर्स परिसरात असलेल्या ओन्ली कुरेशी हॉटेलला बुधवारी (दि.११जून) रात्री अचानक भीषण आग लागली. हॉटेल बंद झाल्यानंतर रात्रीच्या सुमारास ही आग लागली. हॉटेलमधील काम आटोपून कर्मचारी स्टाफ रुममध्ये विश्रांती घेत असताना त्यांना हॉटेलमध्ये आग लागल्याचा फोन आला.संदेश मिळताच कर्मचारी तात्काळ घटनास्थळी धावले व त्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी तातडीने अग्निशमन विभागाला संपर्क करून आग लागल्याची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे बंब तत्काळ घटनास्थळी दाखल झाले व त्यांच्या प्रयत्नांनी आग नियंत्रणात आणण्यात यश आले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी हॉटेलचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. हॉटेलमधील फर्निचर, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, किचन साहित्य आदी जळून खाक झाले.

# संगमनेरच्या पठार भागात वाळू तस्करांची दहशत!

## महसूल पथकाला धक्काबुक्की करुन दोन ट्रॅक्टर नेले पळवून!



संगमनेर : (समर्थ गांवकरी)

तालुक्याच्या पठार भागात वाळू तस्करीचा विळखा अधिकच घट्ट होत चालल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. मांडवे बुद्रूक परिसरात महसूल विभागाच्या पथकावर वाळू तस्करांनी थेट धक्काबुक्की करत कारवाई थांबवली आणि वाळूने भरलेले दोन ट्रॅक्टर पळवून नेले. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला असला, तरी महसूल कर्मचाऱ्यांच्या भूमिकेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

घटनेबाबत मांडवे बुद्रूक येथील तलाठी अभिषेक गोर्डे यांनी घारगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, गुरुवारी सकाळी ९.३० च्या सुमारास तहसीलदारांच्या आदेशावरून वाळू उपसा रोखण्यासाठी तलाठी गोर्डे, महसूल सेवक असिफ शेख आणि शिवनाथ कातोरे यांनी बाचकर वस्तीजवळ कारवाई केली. तेथे त्यांना एक विनाक्रमांक ट्रॅक्टर सापडला. ट्रॅक्टरचालक गोरख भागा बाचकर याने परवाना विचारल्यावर शिवीगाळ व धक्काबुक्की करत ट्रॅक्टर पळवला. या घटनेनंतर साकूरकडे परतत असताना शिंदोडी रोडजवळ दुसरा निळ्या रंगाचा ट्रॅक्टर दिसला. चालक दत्तु राधा बर्डे याच्याकडे परवाना नसल्याने ट्रॅक्टर पोलीस ठाण्यात नेण्यास सांगितले असता त्यानेही पथकाला दमदाटी करत ट्रॅक्टरसह पलायन केले.

या दोन्ही घटनांवरुन गोरख बाचकर व दत्तु बर्डे यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम 132 व 303(2) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गांधले करत आहेत.

या दोन्ही घटनांमध्ये महसूल पथकाने प्रत्यक्ष ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात अपयश येणे, तसेच तस्करांकडून थेट शिवीगाळ आणि दमदाटी स्वीकारून कारवाई टाळणे ही बाब गंभीर आहे. एकाच दिवशी काही मिनिटांच्या अंतरावर घडलेल्या दोन घटनांत दोन्ही ट्रॅक्टर तस्करांच्या हवाली होणे हे महसूल कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न निर्माण करत आहे.

### लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने घ्यावी कठोर भूमिका

संगमनेर तालुक्यात वाळू तस्करांची बिनधास्त हालचाल ही महसूल यंत्रणेच्या अपयशाचे लक्षण मानले जात असून, अशा घटना थांबवण्यासाठी कठोर पावले उचलण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. तहसीलदारांनी या घटनेच्या दुसऱ्या बाजूचाही तपास करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा घेतला निर्णय!



लोणी : (समर्थ गांवकरी)

अहमदाबाद येथे घडलेल्या विमान अपघाताच्या दुर्देवी घटनेच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला असून,कार्यकर्त्यानी जाहीर कार्यक्रम सत्काराचे नियोजन न करण्याचे आवाहन केले आहे.

यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात मंत्री विखे पाटील यांनी म्हणले आहे की,अहमदाबाद येथील विमान अपघाताच्या घटनेत भाजपाचे जेष्ठ नेते आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यासह २६५ प्रवाशांच्या मृत्यूची घटना अत्यंत वेदनादायी आहे.यामध्ये महाराष्ट्रातील दहा व्यक्तीचा समावेश असून कधीही भरून न येणारी हानी असल्याने संपूर्ण देश या घटनेन हादरला आहे.

घटनेतील सर्व मृत नागरीकांना भावपूर्ण श्रद्धांजली आणि त्यांच्या कुटुंबियाप्रति सर्वाच्या संवेदना आहेतच.या कठीण संकटातून सर्व कुटूबियांना सावरण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी ही प्रार्थना आहेच.

आशा सर्व परीस्थितीत कोणतेही सार्वजनीक तसेच सत्कार सोहळे आयोजित करणे उचित होणार नाही.त्यामुळे आपण वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला असून पदाधिकारी कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी सत्काराचे कोणतेही साहीत्य घेवून येवू नये असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

सामाजिक दायित्व म्हणून समाजातील गरजू, निराधार एकल महीलांना मदत तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहीत्य वाटप करावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपक्रमाला पाठबळ म्हणून प्रत्येक गावात वाड्या वस्त्यांवर वृक्ष संवंधानची चळवळ म्हणून एक पेड माँ के नाम उपक्रम राबविण्याचे मंत्री विखे पाटील यांनी सूचित केले आहे.

## पायी दिंडी सोहळा भक्तिभावात रंगला; विठ्ठलवाडी येथे भजन व महाप्रसादाचे आयोजन!

शिवनेरी : (समर्थ गांवकरी)

पंढरपूरच्या दिशेने श्रद्धेचा जल्लोष अनुभवणारा श्री सद्गुरु जानकीदास महाराज पायी दिंडी सोहळा जुन्नर तालुक्यात मोठ्या उत्साहात पार पडला. १९७८ पासून अखंडित सुरु असलेल्या दिंडी क्र. २४ चा हा वारी सोहळा यंदाही भक्तिभावाने सजला. "पंढरीची वारी आहे माझ्या घरी, आणिक न करी तीर्थव्रत" या संत तुकाराम महाराजांच्या वचनानुसार आणि "चंद्रभागे स्नान, आणिक दर्शन विठोबाचे" या संत नामदेवांच्या ओव्यातून प्रकट होणाऱ्या भक्तीचा प्रत्यय या दिंडीत अनुभवास आला.



वारीची सुरुवात बुधवार दि. ११ रोजी सकाळी १० वा. श्री उत्तरेश्वर मंदिर येथून झाली. भगव्या पताका, टाळ-मृदंगाच्या गजरात, महिलांनी डोक्यावर तुळस घेत आणि "ज्ञानोबा माऊली – पांडुरंग विठ्ठला" च्या जयघोषात भाविक मार्गस्थ झाले. गोळेगाव, दिल्ली पेठ, पणसुंबा पेठ, शुक्रवार पेठ, अगर वस्ती, अमरापूर, सुसरबाग आणि विठ्ठलवाडी या ठिकाणी दिंडीने भक्तिपूर्ण मुक्काम घेतला.

विठ्ठलवाडी येथे दत्त मंदिरात कै. नाथा सोनू भास्कर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दुपारी २ वा. भजन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रांगोळ्यांनी सजलेल्या वाटांवर पालखीचे पूजन करण्यात आले. संपूर्ण परिसर संत नामदेव, संत सावता, संत जनाबाई, संत चोखामेळा व संत गोरा कुंभार यांच्या अभंगांनी मंत्रमुग्ध झाला.

दिंडी सोहळ्यादरम्यान पहाटे काकड आरती, चहा-नाष्टा, दुपारी भजन, प्रवचन, हरिपाठ तसेच मुक्कामी कीर्तन व जागर अशा भक्तिप्रवण कार्यक्रमांची रेलचेल होती.

यानंतर दिंडीने हापुस बाग मार्गे शिरोली बुद्रुककडे प्रस्थान ठेवले असून, तेथे पुढील मुक्काम असणार आहे. या पायी वारीत परिसरातील असंख्य नागरिक, महिला-पुरुष भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत वारकरी परंपरेची महान परंपरा अखंड ठेवली.

## सर्व शाळांमध्ये सोमवारी होणार विद्यार्थ्यांचे स्वागत

- गुणवत्ता आणि पटसंख्यावाढीकडे लक्ष देण्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे शिक्षण विभागाला निर्देश

नाशिक : (समर्थ गांवकरी)

नाशिक जिल्ह्यासह राज्यातील सर्व शाळा सोमवारपासून (दिनांक १६) सुरू होत असून शाळेच्या पहिल्या दिवशी मध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. राज्यात स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री महोदय विविध शाळांमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. नाशिक जिल्ह्यातही सर्व लोकप्रतिनिधी तसेच अधिकारी सर्व शाळांमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. याशिवाय, शिक्षण विभागाने गुणवत्ता आणि पटसंख्या वाढीकडे अधिक लक्ष देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा ओघ वाढेल याकडे लक्ष देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार किशोर दराडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, शिक्षण उपसंचालक डॉ. बी. बी. चव्हाण आदींची यावेळी व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मंत्री श्री. भुसे म्हणाले की, सध्या राज्यातील अनेक शाळांमध्ये नवीन उपक्रम राबविले जात आहेत. हे उपक्रम त्या शाळेपुरते मर्यादित न राहता ते सर्व शाळेपर्यंत पोहोचावे, यासाठी नियोजन केले जाईल. विद्यार्थ्यांचा ओढा जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत वाढावा यासाठी अधिक चांगले आणि गुणवत्तापूर्ण वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी शालेय शिक्षण विभागाने प्रयत्न करावेत. येत्या सोमवारपासून सर्व शाळा सुरू होत आहेत. जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि अधिकारी या विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. त्याचे नियोजन जिल्हा परिषदेने तयार केले आहे. विद्यार्थ्यांना पुन्हा या शाळांकडे आकर्षित करण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम साह्यभूत ठरतील, असेही मंत्री श्री. भुसे यांनी यावेळी सांगितले.


यावेळी मंत्री श्री. भुसे यांनी पीएम श्री शाळा, विविध शासकीय योजनेव्दारे शाळांच्या पायाभूत भौतिक सुविधांचा विकास. (पिण्याचे स्वच्छ पाणी, कम्पाऊंड वॉल, स्वच्छतागृह, वर्ग खोली बांधकाम व दुरुस्ती इ.), प्रधानमंत्री पोषण शक्ती कार्यक्रम, राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना, इ. ५ वी आणि ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, आधार पडताळणी / अपार आयडी, शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, हेल्थ कार्ड, निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम आढावा, पवित्र पोर्टल - शिक्षक भरती टप्पा-२, शिक्षक समायोजन, जिल्हा परिषद - स्मार्ट स्कूल मोहीम, जिल्हा परिषद क्षेत्रात पटसंख्या वाढवण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत, शिक्षक / संस्था / अधिकारी यांनी विद्यार्थी हितासाठी राबविलेले नवउपक्रम, आयडॉल शिक्षक बँक, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय शाळा आणि सुपर - ५० कार्यक्रम आदी योजना आणि उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मित्तल यांनी, सुपर ५० तसेच विविध शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या नव्या उपक्रमांची आणि त्याच्या अंमलबजावणीची माहिती दिली. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नितीन बच्छाव यांनी सादरीकरणाद्वारे विविध बाबींची माहिती दिली. यावेळी शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्यासह उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी आदी या बैठकीला उपस्थित होते.



# कला शाखा : उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली

(समर्थ गांवकरी)

एकेकाळी 'आर्ट्स घेऊन काय करणार?' असा प्रश्न विचारला जायचा आणि विज्ञान व वाणिज्य शाखांनाच करिअरचे मुख्य मार्ग मानले जात होते. मात्र, २१ व्या शतकात हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. कला शाखा आता केवळ ज्ञानाची भूक भागवणारी किंवा विचारशक्तीला चालना देणारी शाखा राहिलेली नाही, तर करिअरच्या अनेकविध आणि अमर्याद संधींनी ती भरलेली आहे. पारंपरिक क्षेत्रातही नवनवीन बदल आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे कला शाखेतील विद्यार्थ्यांना विविध आधुनिक आणि नाविन्यपूर्ण क्षेत्रांमध्ये आपले भविष्य घडवण्याची उत्तम संधी मिळत आहे. केवळ शिक्षक किंवा प्राध्यापक होण्यापुरते मर्यादित न राहता, कला शाखेतील पदवीधर आज कॉर्पोरेट जगतापासून ते कला आणि मनोरंजनापर्यंत, प्रशासकीय सेवांपासून ते तंत्रज्ञानापर्यंत




अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपले स्थान निर्माण करत आहेत.

शिक्षकी पेशा हा कायमच सन्मानाचा मानला जातो. ः.Ed./M. Ed. करून तुम्ही शिक्षक किंवा प्राध्यापक म्हणून करिअर करू शकता. तसेच MA नंतर NET/ SET/Ph.D. उत्तीर्ण होऊन महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू होऊ शकता किंवा संशोधनात योगदान देऊ शकता. कायद्याचे पदवीधर (LLः) झाल्यानंतर तुम्ही न्यायालयात वकील म्हणून प्रॅक्टिस करू शकता किंवा कंपन्यांमध्ये कायदेशीर सल्लागार म्हणून काम करू शकता. स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करून तुम्ही थेट न्यायाधीश म्हणूनही सामील होऊ शकता. UPSC (IAS, IPS, IFS, IRS) आणि MPSC (राज्य सेवा, PSI, STI, ASO), पोलीस/मिलिटरी (CDS, SSC), रेल्वे (TTI, गुड्स गार्ड्स, स्टेशन मास्टर) यांसारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये कला शाखेचे विषय खूप उपयुक्त ठरतात. या क्षेत्रात उच्च पदांवर काम करण्याची मोठी संधी आहे. आज बँकिंग क्षेत्रातही कला शाखेच्या विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँका, विमा कंपन्या, शेअर बाजार यांमध्ये तुम्ही प्रोबेशनरी ऑफिसर (PO), लिपिक (Clerk), विकास अधिकारी, विमा एजंट म्हणून करिअर करू शकता. सेवा क्षेत्रात आवड असणाऱ्यांसाठी हॉटेल व्यवस्थापन एक उत्तम पर्याय आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, एअरलाईन्स, शिपिंग कंपन्या, रेल्वे, क्लब यांसारख्या ठिकाणी तुम्ही विविध पदांवर करिअर करू शकता. आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात जनसंवाद क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. वृत्तसंस्था, दूरदर्शन, वेब मीडियामध्ये तुम्ही पत्रकार, वार्ताहर, अँकर, स्तंभलेखक, रेडिओ जॉकी म्हणून काम करू शकता. क्रिएटिव्हिटी आणि कलात्मकता असणाऱ्यांसाठी हे एक आकर्षक क्षेत्र आहे. वस्त्र, दागिने, पादत्राणे, इंटिरियर डिझायनर, ब्युटी केअर (हेअर स्टायलिस्ट, ब्युटी थेरपिस्ट, मेक-अप आर्टिस्ट) म्हणून कंपन्यांमध्ये किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. तसेच जाहिरात संस्थांमध्ये मॉडेलिंगच्या संधी उपलब्ध आहेत. ॲनिमेशन आणि ग्राफिक्स, डिजिटल मार्केटर, इव्हेंट मॅनेजर, विदेशी भाषा तज्ञ, कंटेंट रायटर, फिल्म मेकिंग आणि टीव्ही (अभिनय, निर्मिती, दिग्दर्शन, संपादन, छायांकन, नृत्यदिग्दर्शन, फोटोग्राफी), अभिनय आणि नाटक, नृत्य यांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी आहेत. प्रवासाची आवड असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र उत्तम आहे. तुम्ही टूर आणि ट्रॅव्हल कंपन्या, एअरलाईन्स, हॉटेल्स किंवा स्वतंत्र टूर गाईड आणि ट्रॅव्हल एजंट म्हणून काम करू शकता. समाजासाठी काहीतरी करण्याची तीव्र इच्छा असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र आदर्श आहे. तुम्ही विकास संस्था आणि स्वयंसेवी संस्था (NGOs) मध्ये काम करू शकता किंवा स्वतःचा व्यवसायही सुरू करता येतो. कला शाखेतील विद्यार्थीही तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपले स्थान निर्माण करू शकतात. ःCA/ MCA (संगणक ॲप्लिकेशन्स) करून संगणक ऑपरेटर, प्रोग्रामर, सॉफ्टवेअर प्रोफेशनल, वेब डिझायनर म्हणून करिअरची संधी आहे. ग्रंथपाल आणि माहिती व्यवस्थापन, GIS (भौगोलिक माहिती प्रणाली) आणि ःPO/ KPO मध्येही संधी उपलब्ध आहेत. विक्री आणि विपणन (Sales & Marketing), एअर होस्टेस आणि खेळ (ः.P.Ed., ः.Sc. Physical Education) यांसारख्या आधुनिक आणि वाढत्या क्षेत्रांमध्येही कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वरील सर्व क्षेत्रे त्यांच्या बहुपर्यायी कौशल्यांचा आणि व्यापक दृष्टिकोनाचा प्रभावी उपयोग करावा. शिक्षण आणि संशोधनात विचारशक्ती, भाषावैभव व विश्लेषण कौशल्य उपयोगी पडते. कायद्यात व प्रशासकीय सेवांमध्ये विवेकबुद्धी, मुद्देसूद मांडणी, आणि समाजाभिमुख दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो. बँकिंग, हॉटेल व्यवस्थापन, व विपणन क्षेत्रात संवादकौशल्य आणि सेवा वृत्ती उपयुक्त ठरते. पत्रकारिता, जनसंपर्क, आणि मनोरंजन या क्षेत्रांत अभिव्यक्ती कौशल्य, कल्पकता, आणि सृजनशीलता उपयोगी ठरते. फॅशन,डिझाइनिंग व सौंदर्य क्षेत्रात कलात्मकता आणि शैलीचा भान महत्त्वाचा असतो. प्रवास-पर्यटनात भाषेचे ज्ञान, सांस्कृतिक समज, आणि व्यवस्थापन कौशल्य कामी येते. समाजकार्य आणि NGO क्षेत्रात सहानुभूती, माणुसकी व संघटनकौशल्य उपयुक्त ठरते. तंत्रज्ञान, वेब डिझाइन व GIS मध्येही आता कला शाखेच्या विद्यार्थ्यांचे विश्लेषण कौशल्य व नवोपक्रमशीलता कामी येते. एकूणच, ही सर्व क्षेत्रे कला शाखेतील विद्यार्थ्यांना स्वतःची क्षमता साकार करण्यासाठी मुक्त स्वातंत्र्य देतात. पण हे विद्यार्थी पालक व शिक्षक यांनी कौशल्य अंगीकृत करणे आत्मसात करणे याकडे नको का लक्ष द्यायला ? सदगुण आणि सेवा ,कौशल्य आणि उपयोजन याकडे दुर्लक्ष नका करू. नुसते वाचन एवढेच महत्वाचे नाही, वेळ देऊन कृतीयुक्त शिक्षण घ्याल की नाही ? म्हणून शिकवणारे आणि शिकणारे यांच्या निष्ठा ,जाणीव महत्वाची ठरेल. कोणत्याही गोष्टी वरवर करणे हितकारक नाही. विद्यार्थ्यांची आवड ओळखणे आणि त्या दिशेने प्रामाणिक, योजनाबद्ध आणि चिकाटीने वाटचाल करणे . पालकांनी आपल्या पाल्याच्या स्वभाव, कल, क्षमता आणि मूल्यांचा आदर करावा. मुलांनीही समाजाच्या मागणीनुसार नव्या कौशल्यांचा पाठपुरावा करावा... आजच्या काळात कला शाखा ही यशस्वी करिअर घडवण्याची एक अत्यंत सशक्त आणि विस्तृत वाट आहे. फक्त तुमची आवड, योग्य माहिती आणि योग्य दिशादर्शक अभ्यासक्रम यांची सांगड घालण्याची गरज आहे. बदलत्या काळात कला शाखेच्या विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक नव्हे, तर नावीन्यपूर्ण आणि तंत्रज्ञान-आधारित क्षेत्रांमध्येही मोठी मागणी आहे. त्यामुळे, कला शाखेतील पदवीधरांनी कोणताही न्यूनगंड न बाळगता, उपलब्ध असलेल्या या अमर्याद संधींचा शोध घ्यावा आणि त्यानुसार योग्य अभ्यासक्रम निवडून आपले भविष्य उज्ज्वल करावे.

लेखन - डॉ. सुभाष कारंडे
सहयोगी प्राध्यापक,छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा, प्रसिद्धी सहयोग,समता मिडिया सर्व्हिसेस श्रीरामपूर - 9561174111

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

मुंबई • महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ
रजि. नं. महा/२०२

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई



मराठवाडा विभागाच्या वतीने

## पत्रकार संघाचे मराठवाडास्तरीय

# रौप्य महोत्सवी अधिवेशन

आणि

# मराठवाडा भूषण पुरस्कार सोहळा २०२५

**रविवार, दि.१५ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता.**

**स्थळ : संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर.**

## उद्घाटक

**मा.ना.श्री.संजयजी शिरसाट**
सामाजिक न्यायमंत्री, महाराष्ट्र राज्य.

## प्रमुख पाहुणे

**प.पू.१००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज**

मा.ना.श्री.अतुलजी सावे
कॅबिनेट मंत्री तथा पालकमंत्री, नांदेड

मा.पंकजाताई मुंडे
पालकमंत्री, जालना

मा.ना.श्री.नरहरीजी झिरवाळ
पालकमंत्री, हिंगोली

मा.मेघनाताई बोर्डीकर
पालकमंत्री, परभणी

मा.श्री.डॉ.भागवतजी कराड
खासदार, राज्यसभा

मा.श्री.चंद्रकांतजी खैरे
शिवसेना नेते

मा.श्री.प्रदीपजी जैस्वाल
आमदार, मध्य मतदारसंघ

मा.श्री.प्रशांतजी बंब
आमदार, गंगापूर

मा.श्री.संजयजी केणेकर
आमदार, विधानपरिषद

मा.संजनाताई जाधव
आमदार, कन्नड

मा.अनुराधाताई चव्हाण
आमदार, फुलंब्री

मा.श्री.जयदीपजी कवाडे
अध्यक्ष महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ

मा.श्री.मधुकर अण्णा वैद्य
जेष्ठ पत्रकार

मा.श्री.नंदकुमारजी घोडेले
माजी महापौर

मा.श्री.सिध्दार्थ भोकरे
प्रदेशाध्यक्ष, डिजिटील मिडिया

## प्रमुख उपस्थिती

मा.श्री.संजयजी भोकरे
संस्थापक अध्यक्ष

मा.श्री.अशोक वानखेडे
राष्ट्रीय अध्यक्ष

मा.श्री.गोविंद वाकडे
प्रदेशाध्यक्ष

मा.श्री.डॉ.विश्वास आरोटे
प्रदेश सरचिटणीस

मा.श्री.अशोक देडे
प्रदेश उपाध्यक्ष

मा.श्री.वैभव स्वामी
प्रदेश संपर्क प्रमुख

मा.श्री.नितीन शिंदे
राज्य समन्वयक

मा.श्री.नवनाथ जाधव
प्रदेश प्रसिध्दी प्रमुख

मा.श्री.निलेश सोमाणी
कार्याध्यक्ष

## विशेष अतिथी

मा.जयंतीताई कठाळे
प्रशासकीय संचालिका
पूर्णब्रह्म, बंगळुरू

मा.श्री.योगेश शिरसाट
प्रसिध्द अभिनेते
मुंबई

मा.सरिताताई कौशिक
संपादिका
ए.बी.पी माझा, मुंबई

## परिसंवाद

# भारतीय माध्यमांचा DNA कोणता?

**माध्यमांचे भूत, वर्तमान आणि भाविष्य**

## उद्घाटक

**मा.ना.श्री.अतुलजी सावे**
इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास,
अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग मंत्री, महाराष्ट्र राज्य.

## परिसंवाद अध्यक्ष

**मा.श्री.अशोक वानखेडे**
राष्ट्रीय अध्यक्ष

## संवादिका

**मा.अश्विनीताई डोके**
पुणे

## सहभागी वक्ते

मा.सरिताताई कौशिक
संपादिका एबीपी माझा

मा.श्री.सुधीर गव्हाणे
माजी कुलगुरू

मा.श्री.गोविंद वाकडे
प्रदेशाध्यक्ष

मा.श्री.संजय भोकरे
संस्थापक अध्यक्ष

मा.श्री.संजय सोनवणी
पुणे

मा.श्री.ॲड.महेश भोसले
छत्रपती संभाजीनगर

मा.श्री.अविनाश वानखेडे
पुणे

मा.श्री.सुशील कुलकर्णी
संपादक ॲनालायझर

## विशेष सहकार्य

मा.श्री.अशोक देडे
प्रदेश उपाध्यक्ष

मा.श्री.वैभव स्वामी
प्रदेश संपर्क प्रमुख

मा.श्री.अभयकुमार दांडगे
प्रदेश उपाध्यक्ष

मा.श्री.रूपेश पाडमुख
राज्य निवड समिती अध्यक्ष

मा.श्री.कुंडलिक वाळेकर
मराठवाडा संपर्क प्रमुख

## मराठवाडा विभाग

मा.श्री.दिगंबर गुजर
जालना जिल्हाध्यक्ष

मा.श्री.दिलीप माने
परभणी जिल्हाध्यक्ष

मा.श्री.गजानन मगर
हिंगोली जिल्हाध्यक्ष

मा.श्री.संग्राम मोरे
नांदेड जिल्हाध्यक्ष

मा.श्री.महादेव डोंबे
लातूर शहराध्यक्ष

मा.श्री.अमजद खान पठाण
बीड जिल्हाध्यक्ष

मा.श्री.धनंजय पाटील
धाराशिव जिल्हाध्यक्ष

मा.श्री.निळकंठ मदने
उत्तर नांदेड जिल्हाध्यक्ष

मा.श्री.शेख आयेशा रफिक
बीड जिल्हाध्यक्ष

## आयोजक

**मा.श्री.अनिल सावंत**
**मराठवाडा अध्यक्ष**

**मा.डॉ.छबुराव ताके**
**जिल्हाध्यक्ष छ.संभाजीनगर**

मा.श्री.देविदास कोळेकर
शहराध्यक्ष

मा.श्री.जे.ई.भांबर्डे
जिल्हा उपाध्यक्ष

मा.श्री.विलास इंगळे
सल्लागार, मराठवाडा

मा.श्री.मनोज पाटणी
सहसचिव, मराठवाडा

मा.श्री.महेंद्र डेंगळे
सचिव, मराठवाडा

मा.श्री.विलास शिंगी
कार्यकारिणी सदस्य

मा.श्री.उमेश जोशी
महानगर अध्यक्ष

मा.श्री.सचिन अंभोरे
प्रसिध्दी प्रमुख

मा.श्री.ज्ञानेश्वर खंदारे
सल्लागार मराठवाडा

मा.श्री.संजय हिंगोलीकर
जिल्हा संघटक

मा.श्री.सुजीत ताजणे
संपर्क प्रमुख

मा.श्री.रविंद लांडगे
सहसचिव

मा.श्री.शिवाजी गायकवाड
सहप्रसिध्दी प्रमुख

मा.श्री.विजय बनसोड
गंगापूर

मा.श्री.ज्ञानेश्वर तांबे
पैठण

मा.श्री.संताराम मगर
ग्रामीण जिल्हाध्यक्ष

मा.श्री.विजय गायकवाड
वैजापूर

मा.श्री.नारायण गायकवाड
सदस्य

मा.श्री.आनंद अंभोरे
सदस्य

मा.श्री.माधव खिल्लारे
सदस्य

मा.श्री.चंद्रकांत चाबुकस्वार
सदस्य

सर्व पदाधिकारी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई मराठवाडा विभाग, छत्रपती संभाजीनगर.

**सर्व उपस्थित मान्यवर व सदस्यांचे मन:पूर्वक स्वागत...!**



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई.
सस्नेह निमंत्रण!
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई
25 Year
रौप्य महोत्सव
रौप्य महोत्सवी अधिवेशन
छत्रपती संभाजीनगर - २०२५
मराठवाडा भूषण पुरस्कार सोहळा.
रविवार,दि.१५ जून २०२५ । वेळ : सकाळी १०:०० वा.
स्थळ : संत एकनाथ रंग मंदिर, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर.
सर्व मान्यवरांचे
हार्दिक स्वागत!
स्वागतोत्सुक : डॉ. विश्वासराव आरोटे
राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
संपादकः दैनिक समर्थ गांवकरी, A.V.P न्यूज, समर्थ गांवकरी न्यूज.
संचालकः अकोले ग्रामीण बिगर शेती पतसंस्था, अकोले
Shubham Gaikar Editz | 7517656879

राष्ट्रीय अध्यक्ष

मा.श्री.अशोकराव वानखेडे

नुतन प्रदेश अध्यक्ष

मा.श्री.गोविंदराव वाकडे

नुतन प्रदेश कार्याध्यक्ष

मा.श्री.निलेश सोमणी

सोशल मिडीया प्रदेश अध्यक्ष

श्री.सिध्दार्थ भोकरे

प्रदेश संपर्क प्रमुख

मा.श्री.वैभव स्वामी

संस्थापक अध्यक्ष

मा. श्री. संजयजी भोकरे (साहेब)

इलेक्ट्रॉनिक मिडीया प्रदेश अध्यक्ष

श्री.अतुल परदेशी

प्रदेश प्रसिद्धी प्रमुख

मा.श्री.नवनाथ जाधव

आरोग्य सेल प्रदेश अध्यक्ष

मा.श्री.अमितकुमार खाडे

पत्रकार हल्ला विरोधी समिती प्रदेश अध्यक्ष

मा.श्री.किशोर पाटील


श्री.रमजान मन्सुरी
गुजरात प्रदेश अध्यक्ष


श्री.मनिष महाजन
मध्यप्रदेश अध्यक्ष


राजश्री चौधरी
दिल्ली प्रदेश अध्यक्ष

प्रवक्ते

मा.श्री.रमेश डोंगरे

सांस्कृतिक विभाग अध्यक्ष प्रदेश अध्यक्ष

श्री.संदिप भटेवरा

कायदेविषयक सल्लागार

ॲड.रचना भालके

प्रदेश सहसंपर्क प्रमुख

श्री.कुंदन पाटील

राज्य निवड समिती अध्यक्ष

श्री. रुपेश पाडमुख


श्री.आबा खवणेकर
गोवा प्रदेश संपर्क प्रमुख


श्री.रघुनाथ सोनवणे
दिल्ली प्रदेश संपर्क प्रमुख

संकल्प असावेत
नवे तुमचे मिळाव्यात
त्यांना नव्या दिशा
प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुझेह्याच
वाढदिवसाच्या
शुभेच्छा:!





## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

## प्रदेश अध्यक्ष

# मा. श्री. गोविंदजी वाकडे (माऊली)

आपणांस वाढदिवसाच्या

# हार्दिक शुभेच्छा...!

### प्रदेश कार्यकारिणी सदस्य / विभागीय अध्यक्ष

सौ.सुरेखा खानोरे (सचिव), श्री.अशोक देडे (प्रदेश उपाध्यक्ष), श्री.अभयकुमार दांडगे (प्रदेश उपाध्यक्ष), श्री.महेश पानसे (प्रदेश उपाध्यक्ष), श्री.किशोर रायसाकडा (प्रदेश उपाध्यक्ष), श्री.नितीन म.शिंदे (राज्य समन्वयक), पराग कुंकुलोळ (प्रदेश सहसंपर्कप्रमुख)
श्री.नितीन जाधव (मंत्रालय संपर्क प्रमुख), श्री.सोमनाथ देशकर (प्रदेश निवड सल्लागार), राजेंद्र कोरटे (पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष),
श्री.नयन मोंढे (विदर्भ प्रमुख), श्री.सुनील फुलारी (अमरावती विभाग अध्यक्ष), श्री.शैलेश पालकर (कोकण विभागीय अध्यक्ष),
श्री.अनिल सावंत (मराठवाडा विभागीय अध्यक्ष), श्री.अनुपकुमार भार्गव (नागपूर विदर्भ प्रमुख),
श्री.भुवनेश दुसाने (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष),

**प्रदेश कार्यकारिणी सदस्य :**

श्री.प्रशांत कांबळे (मुंबई), श्री.सुरेश खोसे (अहिल्यानगर), श्री.स्वामीराज गायकवाड (सोलापूर), श्री. राजु पाटील शिंपाळकर (नांदेड),
श्री.स्वामी शिरकुल (मुंबई), श्री.सुभाष विसे (ठाणे), श्री.बाजीराव फराकटे (कोल्हापूर),
श्री.अनिल रहाणे (अहिल्यानगर), कु.श्रध्दा ठोंबरे (बदलापूर), श्री.पराग कुंकूलोळ (पिंपरी चिंचवड),
श्री.लक्ष्मण डोळस (नाशिक), श्री.सिताराम गावडे (सिंधूदुर्ग), श्री.अरुण लोखंडे (तुळजापूर),
श्री.शरद नागदेवे (नागपूर), श्री.सुभाष डोके (प्रदेश का. सदस्य),
श्री.कुंडलिक वाळेकर (औरंगाबाद), श्री.रवींद्र गुरव (नंदुरबार), श्री.अबरार मिर्झा (जळगाव),
श्री.संतोष खालकर (सातारा), श्री.पंकज सोनवणे (वाशिम), प्रा.जसपाल सिंह सिसोदिया (धुळे),
श्री.संजोग काळदंते (पश्चिम महाराष्ट्र सचिव), श्री.नाविद अहमद (हिंगोली), विकास कदम (सातारा)

संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष व सभासद



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ; मुंबई

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ; मुंबई

: शुभेच्छुक :

**डॉ. श्री. विश्वासराव आरोटे**

प्रदेश सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई
प्रदेश सरचिटणीस महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई
संपादक : दैनिक समर्थ गांवकरी वृत्तपत्र समुह, महाराष्ट्र